(19)

# मा.दिवाणी न्यायाधिश साहेब,वरिष्ठ स्तर कोर्ट गंगाखेड

हिं.वि.अर्ज क्र.66/2024

Exh-18

कोंडीराम उर्फ कोंडीबा

**विरूध्द**

सौ.आशाबाई

वाद : हिंदू विवाह कायदा कलम 13(1) तहत

**शपथपत्र सरतपासणीचे**

ORDER
Read & recorded.

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.09.16 13:10:56 +0530

CJSD, Gangakhed.

Superintendent
C.J.S.D.Court
Gangakhed

मी कोंडीराम उर्फ कोंडीबा पि.विठलराव गादेकर,वय :47 वर्षे,धंदा :व्यापार रा.अकोली हा.मु.भाग्य नगर,गंगाखेड ता.गंगाखेड जि.परभणी शपथेवर निवेदन करतो की, मी व गैरअर्जदाराचा विवाह हिदूं चाली रिती व रूढी परंपरेनुसार सन 2006 मध्ये मौजे अकोली ता.गंगाखेड येथे झाला. अशाप्रकारे आमचे पती पत्नीचे नाते आजही कायम आहे. गैरअर्जदार व माझे गाव एकच असल्यामुळे ती माइया घरी नांदण्यास आली काही महिने माइयाकडे व्यवस्थीत राहिली त्यांनतर बाळंतपणा साठी म्हणुन वडीलांच्या घरी निघुन गेली त्यावेळी तीला मुलगा प्रशांत झाला असुन त्याचे वय 16 आहे. त्यानंतर गैरअर्जदार ही माइयाकडे नांदण्यास येण्यास टाळाटाळ करत होती. म्हणुन मी चौकशी केली असता गैरअर्जदार हिचे मौजे अकोली गावातील इसम केशव गिरी यांच्या सोबत अनैतिक संबंध माइया परस्पर मला माहिती न होवू देता ठेवले.

मी शपथेवर निवेदन करतो की, गैरअर्जदार हिचे केशव गिरी सोबत अनैतिक संबंधाची माहिती मला झाल्यानंतर मी गैरअर्जदाराच्या आईवडीलास सांगितले.तीचे भाउ व वडील यांनी तीला समजावुन सांगण्याऐवजी चुक झाकण्यासाठी गैरअर्जदार मार्फत फौ.कि.अ.क्र. 10/2009 दाखल केला. तरी सुध्दा गैरअर्जदाराने माइया विरूध्द विवाह संबंध पुर्नप्रस्थापित व्हावे म्हणुन अर्ज क्र.101/2008 दाखल केला. गैरअर्जदाराने माइया विरूध्द दि.दा.क्र.12/2009 वाटणी व पुर्नविवाह करू नये म्हणुन खोटेपणाने दाखल केला. पंरतू सामाजिक परिस्थती व भविष्याचा विचार करता मी चांगली भुमीका घेवून गैरअर्जदार नांदण्याचा विचार करून सालसन 2011 मध्ये तडजोड झाली व आमचा संसार सुरू झाला.

मी शपथेवर निवेदन करतो की, आमच्या समझोत्यानंतर दोन वर्ष अकोली येथे राहीलो त्यानतर गैरअर्जदाराने माइया सोबत शहरात राहाण्याची इच्छा व्यक्त केलयामुळे मी तीला गंगाखेड येथे राहाण्यास घेवून आलो त्यावेळी गैरअर्जदार ही माइया पासुन गरोदर राहिली सालसन 2015 मध्ये गैरअर्जदारास श्रीनिवास वय 9 वर्ष व सन 2016 श्रीकृष्ण वय 8 वर्ष हे अपत्य झाले. श्रीनिवास व श्रीकृष्ण हे गैरअर्जदारा सोबत अकोली येथे राहातात. आम्ही भाग्यनगर गंगाखेड येथे नागेश पैठणकर यांचे घरी किरायाने राहात होतो. मी गंगाखेड येथे छोटा मोटा व्यापार करू लागलो. त्यासाठी मी घराबाहेर सकाळी 9ते रात्री 9 घराबाहेर राहात होतो. नागेश पैठणकर यांचे घरात रवि उडाणशिव हे सोन्याचे व्यापारी किरायाने राहात आहेत. गैरअर्जदार हिने रवि यांचे मैत्री करून त्याचे रूपातंर प्रेमात होवून रवि उडाणशिव यांच्या सोबत अनैतिक संबंध प्रस्तापित केले.

मी शपथेवर निवेदन करतो की, दि.08.04.2024 रोजी मी अचानक घरी आलो असता कोणी दिसले नाही म्हणुन मी खालच्या मजल्यावर रवि उडाणशिव यांच्याकडे गेलो असता रवि उडाणशिव यांचा दरवाजा आतुन न लावता लोटुन घेतला त्यावेळी गैरअर्जदार व रवि उडाणशिव हे नग्न अवस्थेत एकमेकांशी संभोग करताना प्रत्यक्ष पाहिले.त्यावेळी माझा राग अनावर झाला व गैरअर्जदार रवि उडाणशिव यांनी आमची चुक झाली माफ करा पुन्हा असे होणार नाही म्हणुन माफी मागीतली. परंतू माइया मनात विश्वासघाताची तीव्र वेदना होवून मी तेथून निघुन गेलो.

गैरअर्जदाराचे अनैतिक संबंधाचे कृत्य मी गैरअर्जदाराच्या आईवडील व भाउ यांच्या निदर्शनास आणुन दिले त्यावेळी गैरअर्जदाराचा भाउ गोकुळ प्रभु वाणी यास गैरअर्जदाराने बोलावून घेतले व मुल श्रीनिवास व श्रीकृष्ण यांना घेवून माहेरी निघुन गेली. गैरअर्जदाराच्या व्यभिचारी वागण्यामुळे अर्जदाराच्या मानसिक स्वास्थ्यावर व सामाजिक प्रतिक्षेवर विपरीत परिणाम झाला व त्याच्या मनातुन जगण्याची इच्छा संपुष्टात आली. अशी भावना निर्माण झाली गैरअर्जदाराच्या वागण्यामुळे मला कठोर वेदना झाल्या. गैरअर्जदाराच्या सततच्या वागण्यामुळे मला तीच्या सोबत संसार करण्याची इच्छा संपली. मी गैरअर्जदारा सोबत संसार भविष्यात करू शकत नाही.

Superintendent
C.J.S.D.Court,
Gangakhed

मी शपथेवर निवेदन करते की, मी गैरअर्जदारास स्पष्ट सांगितले की, माझी गैरअर्जदारासोबत संसार करण्याची इच्छा नाही. त्यामुळे गैरअर्जदाराने मला कायदेशिर फारकत देवून मुक्त करावे. परंतू त्यास गैरअर्जदार ही टाळाटाळ करत आहे म्हणुन मी दि.20.04.2024 रोजी गैरअर्जदारास आपल्या विधिज्ञामार्फत कायदेशिर फारकत घेण्यासाठी गैरअर्जदारास नोटीस पाठविली. परंतू सदर नोटीस ही गैरअर्जदारास प्राप्त होवून सुध्दा कोणत्याही स्वरूपाचाचे उत्तर दिले नाही व फारकती साठी आली नाही त्यामुळे सदर नोटीस दि.24.04.2024 हीच गैरअर्जदाराचा नकाराचे सबळ कारण समजुन प्रस्तुत अर्ज गैरअर्जदारा विरूध्द मा.न्यायालयात सादर करण्यात आला आहे.

मी शपथेवर निवेदन करतो की, नि.क.4 खाली दाखल केलेले कागदपत्रे त्यास निशाणी क्रमांक देवून ते साक्षीपुराव्या कामी वाचण्यात यावे व गैरअर्जदाराने दाखल केलेला वादोत्तर पूर्णत खोटे असुन ते बनावट स्वरूपाचे आहे ते खारीज करण्यात यावे.करीता सरतपासाचे शपथपत्र देण्यात येते.

16/9/25

Superintendent
C.J.S.D.Court.
Gangakhed

दिनांक : 16.09.2025

निवेदक

कोंडीराम उर्फ कोंडीबा पि.विठलराव गादेकर,
रा.अकोली हा.मु.भाग्य नगर,गंगाखेड
ता.गंगाखेड जि.परभणी

**सत्यापन**

मी निवेदक शपथेवर निवेदन करतो की,वरील शपथपत्रातील नमुद मजुकर माझ्या माहितीने लिहीला असुन तो खरा व बरोबर असुन मला मान्य व कबुल आहे करीता आज रोजी मौजे गंगाखेड येथे शपथेवर तसदिक करण्यात येत आहे.

दिनांक : 16 .09.2025

निवेदक

कोंडीराम उर्फ कोंडीबा पि.विठलराव गादेकर,
रा.अकोली हा.मु.भाग्य नगर,गंगाखेड
ता.गंगाखेड जि.परभणी

AFFIDAVIT

Solemnly affirmed before me
by Kondiram Vitthalrao Gadekar
Age 47 yrs occu. Business R/o Gangakhed.
Who is Identified before me
by Adv. R. D. Jayapal

to whom I Know Personally

CJSD Court Gangakhed 16/9/2023

Adv.
Identified by me